0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :-

१) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १०/०१/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०२/२०१३/जा.३९, दिनांक १४/०१/२०१३ व ३०/०१/२०१३.

३) मो.सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चे मालक म्हणून शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु व थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चा मालक म्हणून अब्दुल सलाम ए शेख यांचे दिनांक २९/०१/२०१३ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

४) मो.सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चे मालक म्हणून शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु व थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चा मालक म्हणून अब्दुल सलाम ए शेख यांचे दिनांक ०६/०२/२०१३ रोजीचे स्वतंत्र निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.०२/२०१३/जा.२८३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज. टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक २० / ३ /२०१३.

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ३१/१२/२०१२ रोजी अंबोजवाडी येथील आझाद नगर, गणेश मिल्क सेंटर समोरील झोपडपट्टीच्या विभागात, मालवणी, मालाड (प), मुंबई ४०० ०९५ येथे गैरमार्गाने खरेदी केलेल्या घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरमधील गॅस व्यवसायीक वापराच्या सिलेंडरमध्ये अवैधरित्या रिफीलींग होत असल्याबाबतची या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह उक्त ठिकाणी दुपारी १२:३० वाजता टेहळणी केली व गणेश मिल्क सेंटर समोरील आझाद नगर झोपडपट्टीच्या कोपऱ्यावरील भंगाराच्या दुकानाच्या मागील बाजूस तात्पुरत्या बांबुने बनविलेले व त्याला पांढऱ्या रंगाच्या प्लॅस्टिक कल्तनाने चहुबाजुने बंदीस्त करुन पुढील बाजुस लाकडी दरवाजा असलेले तसेच सदर झोपडीच्या वरील भाग हा

ताडपत्रीने आच्छादलेल्या अशा कच्चा झोपड्याच्या दरवाजाजवळ पोहाचले. त्यावेळी सदरचा दरवाजा बंद अवस्थेत आढळला. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदरचा दरवाजा ठोठावून उघडण्यात आला. त्यावेळी सदर वर नमुद झोपडीमध्ये ५ इसम अवैधरित्या खरेदी केलेल्या घरगुती वापराच्या ५ गॅस सिलेंडरमध्ये भरलोकवस्तीत भरत असताना पाचही इसमांना अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. सदर झोपडीतील उपस्थित असलेल्या पाचही इसमांना, अधिकाऱ्यांनी स्वत:ची व पंचांची ओळख करुन दिली व सदरचे गैरकृत्य थांबविण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष उपस्थित इसमांचे नांव विचारले असता, त्यापैकी एकाने त्याचे नांव शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु असे सांगितले. अधिकाऱ्यांनी अधिक सखोल चौकशी केली असता, तो नमूद झोपडपट्टीमध्ये मागील २ ते ३ महिन्यांपासून त्याच्या चार सहकारी/कर्मचारी नामे मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख, अब्दुल कलाम शेख व मोहम्मद अकिल यामिन कुरेशी यांचे मदतीने घरगुती वापराचे गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक वापराच्या गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरुन तो काळ्या बाजारीने विक्री करीत असल्याचे सांगितले. सदर घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा साठा तो मुक्ता गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चंद्रकांत चव्हाण, आसु गॅस एजन्सी कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय मनीराम, सुरेंद्र व बुध्दु व कृष्णा गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चव्हाण यांचेकडून घरगुती वापराचे प्रति सिलेंडर रुपये १,०००/- प्रमाणे खरेदी करुन त्याच्या सहकाऱ्यांच्या मदतीने व्यवसायीक वापराच्या रिकाम्या सिलेंडरमध्ये लोखंडी नळीद्वारे भरण्याचे काम करीत असल्याचे सांगून सदर भरलेले व्यवसायीक सिलेंडर रुपये १,५५०/- प्रति सिलेंडर याप्रमाणे डिलेव्हरी मॅनच्या मदतीनेच गरजू व्यवसायीक ग्राहकांना देत असल्याचे सांगितले. सदर कामी त्याला मिळणाऱ्या नफ्यातून त्याच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना प्रति व्यक्ती प्रति दिन २०० ते ३०० रुपये मेहनताना देत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी झोपडीबद्दल अधिक विचारणा केली असता, सदरची जागा ही संपूर्ण झोपडपट्टी विभागातील तात्पुरत्या स्वरुपात बांधण्यात आलेल्या व्यवसाय करतो. तसेच सदर जागेचा त्याच्याकडे कोणताही पुरावा नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी बबलु याची झाडझडती घेऊन त्याच्याकडील भ्रमणध्वनी क्रमांक ९९६७१६५४७२ ताब्यात घेतला. सदर अनधिकृत व्यवसायाकरिता गैरमार्गाने विक्री केलेल्या व्यवसायीक सिलेंडर्सचा मोबदला म्हणून विविध व्यवसायीकांकडून जमा करावयाच्या रोख रकमेकरीता तो त्याची मोटार सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चा वापर करत असल्याचे सांगितले. तद्नंतर बबलु याने घरगुती गॅस सिलेंडर काळा बाजाराने विकत घेऊन अनधिकृतपणे व्यवसायीक सिलेंडरमध्ये रिफिलिंग करणे हा व्यवसाय केवळ त्याच्या वैयक्तिक फायद्याकरीता करीत असल्याचे सांगून सदर व्यवसाय अनधिकृत असल्याची त्याला पूर्ण जाणीव आहे असे अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. याबाबत शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदवून घेतला आहे.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी मालवणी पोलिस ठाणे येथे भ्रमणध्वनीवरुन संदर घटनेची प्रथम खबर दिली व घटनास्थळी मालवणी पोलिस ठाणे येथील मालवणी मोबाईल २ वायरलेस वाहन क्र. एमएच-०२-एसए-१५२ यामधून पोलिस अधिकारी व शिपाई घटनास्थळी उपस्थित राहिले. त्यांना सदर घटनेची रितसर माहिती अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष दिली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच तसेच पोलिसांसमक्ष शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याचे सहकारी साथीदार नं. १ मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान याचेकडे चौकशी केली. चौकशी दरम्यान तो संदर झोपडीमध्ये अडीच महिन्यांपासून हेल्पर म्हणून गॅस सिलेंडर भरण्याचे काम करतो. त्यापोटी त्याला मालक शकील अहमद उर्फ बबलु हे दिवसाला रुपये २५०/- रोजंदारी देतात. तो घरगुती असलेले गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये लोखंडी नळीद्वारे भरणा करण्याचे काम करतो व त्याचे वजन काट्यावर वजन करुन तो बाजुला ठेवतो. सदरचे काम मालक शकील अहमद याच्या सांगण्यावरुन करतो. सदरचे गॅस सिलेंडर स्थानिक गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय आणून देतात. सदरचा सर्व व्यवहार मालक शकील अहमद हे पाहतात, असे सांगितले व तसा त्याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदवून घेतला आहे.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच तसेच पोलिसांसमक्ष शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याचे सहकारी साथीदार नं. २ इमरान फकीर अहमद शेख याच्याकडे चौकशी केली व त्याची अधिकाऱ्यांनी झाडझडती घेऊन त्याच्याकडील भ्रमणध्वनी क्रमांक ९८९२१५०३६५ हा भ्रमणध्वनी ताब्यात घेतला. चौकशी दरम्यान त्याने त्याचे वय वर्ष २९ असे सांगून सदर झोपडपट्टीमध्ये अडीच महिन्यांपासून गॅस सिलेंडर भरण्याचे काम करतो. त्यापोटी त्याला मालक शकील अहमद उर्फ बबलु हे दिवसाला रुपये १५०/- रोजंदारी देतात. तो घरगुती असलेल्या गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये लोखंडी नळीद्वारे भरणा करण्याचे काम करतो व त्याचे वजन काट्यावर वजन करुन ते बाजुला ठेवतो. अशारितीने दररोज १० ते १५ व्यवसायीक सिलेंडर्स भरले जातात. सदरचे काम गेले [illegible] दिवसापासून करीत आहे. शकील अहमद उर्फ बबलु हे घरगुती गॅस सिलेंडर्स स्थानिक गॅस सिलेंडर्स डिलेव्हरी बॉयकडून घेतात. याची सर्व माहिती शकील अहमद उर्फ बबलु यांना माहित आहे. सदर झोपडीत ५ घरगुती गॅस सिलेंडर्स, १७ व्यवसायीक गॅस सिलेंडर्स, एक ६० किलोग्रॅम वजनाचा इलेक्ट्रॉनिक वजनाचा वजनकाटा तसेच रिफीलिंग करण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या ३ लोखंडी नळ्या घरगुती गॅस सिलेंडर्सचे तोडलेली ८५ पिवळी सिले असलेली पिशवी तसेच नव्याने भरण्यात आलेल्या व्यवसायीक वापराच्या सिलेंडर्सला लावण्यात येणाऱ्या बनावट सिल इत्यादी साहित्य त्याने अधिकाऱ्यांच्या ताब्यात दिले. संदरचे गॅस सिलेंडर स्थानिक गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय आणून देतात. सदरचा सर्व व्यवहार शकील अहमद हे पाहतात, असे सांगितले व तसा त्याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदवून घेतला आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...BAI

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच व पोलिसांसमक्ष शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याचे सहकारी साथीदार नं. ३ अब्दुल कलाम अयुब शेख याच्याकडे चौकशी केली व अधिकाऱ्यांनी झाडझडती घेऊन त्याच्याकडील भ्रमणध्वनी क्रमांक ७७३८७४००२२ हा ताब्यात घेतला. चौकशी दरम्यान त्याने त्याचे वय वर्ष ३२ असे सांगून टेम्पो क्र. एमएच-०२-सीई-१३१८ चें मालक अब्दुल सलाम ए शेख यांच्याकडे मागील दोन महिन्यांपासून दिवसापोटी रुपये ३००/- प्रमाणे ड्रायव्हरची नोकरी करतो. सकाळी ११ वाजता टेम्पोमालक यांच्या राहत्या घरातून वर नमूद टेम्पोची चावी घेऊन म्हाडा कॉलनी, गेट नं. ६, मस्जिद जवळ मालवणी मालाड येथे घेऊन आल्यानंतर मुक्ता गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चंद्रकांत बळवंत चव्हाणकडून ५ घरगुती वापराचे भरलेले गॅस सिलेंडर्स घेऊन टेम्पोत भरले व सदर टेम्पो घेऊन अंबोजवाडी, आझाद नगर झोपडपट्टीतील गणेश मिल्क सेंटर समोर असलेल्या भंगारच्या झोपड्यांच्या मागील बाजूस असलेल्या झोपडीजवळ घेऊन आल्यानंतर तेथे उपस्थित असलेले इम्रान शेख, शकील अहमद खान, जावेद खान व अखिल कुरेशी यांच्याकडे दिले. मागील दिड महिन्यांपासून भरलेले घरगुती वापराचे गॅस सिलेंडर घेऊन अंबोजवाडी, आझाद नगर झोपडपट्टी येथील शकील अहमद उर्फ बबलुच्या झोपडीत आणून सोडतो. भरलेले घरगुती वापराचे गॅस सिलेंडर्स रिकामे झाल्यांनतर घरगुती वापराचे गॅस सिलेंडर्सचे प्रत्येकी रुपये १,०००/- शकील अहमद उर्फ बबलु हे त्याच्याकडे वर नमूद डिलेव्हरी बॉयना देण्याकरिता देत असतात व घरगुती वापराच्या गॅस सिलेंडर्सचे प्रत्येकी १,०००/- रुपये एच.पी. कंपनीच्या डिलेव्हरी बॉय मणिराम, बुध्दु व सुरेंद्र तसेच भारत गॅस एजन्सीचा चंदुभाई या डिलेव्हरी बॉय देत असतो असे त्यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले व तसा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदवून घेतला आहे.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच व पोलिसांसमक्ष शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याचे सहकारी साथीदार नं. ४ मोहम्मद अकील यामिन कुरेशी याच्याकडे चौकशी केली व अधिकाऱ्यांनी झाडझडती घेऊन त्याच्याकडील भ्रमणध्वनी क्रमांक ९८६७३३८५४४ हा ताब्यात घेतला. चौकशी दरम्यान त्याने त्याचे वय वर्ष २६ असे सांगून तो सदर झोपडीमध्ये तीन महिन्यांपासून गॅस सिलेंडर भरण्याचे काम करतो. त्यापोटी त्याला मालक शकील अहमद उर्फ बबलु दिवसाला रुपये ३००/- रोजंदारी देतात. तो घरगुती असलेले गॅस सिलेंडर्समधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये लोखंडी नळीद्वारे भरणा करण्याचे काम वर नमूद साथीदारांबरोबर करतो व त्याचे वजन काट्यावर वजन करुन तो बाजूला ठेवतो. सदरचे काम मालक शकील अहमद याच्या सांगण्यावरुन करतो. सदरचे गॅस सिलेंडर स्थानिक गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय आणून देतात. सदरचा सर्व व्यवहार मालक शकील अहमद हे पाहतात, असे सांगितले व तसा त्याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदवून घेतला आहे.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंच तसेच पोलिसांसमक्ष शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याच्या भ्रमणध्वनीवरुन आलेला भ्रमणध्वनी क्रमांक ९८३३११७७२८ कोणाचा आहे असे त्यास विचारले असता त्याने सदरचा भ्रमणध्वनी क्रमांक चंदुचा आहे असे सांगितले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी शकील अहमद नबील अहमद उर्फ बबलु याला सदर भ्रमणध्वनीवर संपर्क करण्यास सांगितले व सदर भ्रमणध्वनीचा स्पिकर चालू ठेवण्याचेही अधिकाऱ्यांनी आदेश दिले. त्याप्रमाणे चंदु यांनी सदरच्या भ्रमणध्वनी उचलून सकाळी दिलेले घरगुती ५ गॅस सिलेंडर्स रिकामे करुन ते त्याला परत करावे असे सांगितले. सदरचे संभाषण अधिकाऱ्यांनी व पंचांनी ऐकले, त्यानंतर घटनास्थळी उपस्थित असलेले मालवणी मोबाईल २ चे पोलिस, पंच व घटनास्थळी उपस्थित असलेल्या पथकातील सदस्यांपैकी शिधावाटप निरिक्षक असे पोलिस वाहन क्रमांक एमएच-०२-एसए-१५२ मधून चाळ क्र. १२३, म्हाडा वसाहत, मालवणी, मालाड(प) या चंदु उभे असलेले ठिकाणी रवाना झाले. सदर ठिकाणी पथक पोहचले असता तेथे थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ मध्ये घरगुती वापराचे सिलेंडर्स भरलेले अधिकाऱ्यांना दिसले व सदर टेम्पो शेजारी निळा गणवेश परिधान केलेला इसम दिसला. अधिकाऱ्यांनी सदर इसमास स्वत:ची ओळख करुन देऊन त्याचे नांव विचारले असता, त्याने त्याचे नांव चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदू असे सांगून तो मुक्ता गॅस एजन्सी, मालाड येथे डिलेव्हरी बॉय म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी चंदू यास अधिक विचारणा केली असता, त्याने तो काम करीत असलेल्या मुक्ता गॅस एजन्सीकडून ग्राहकांना वितरणासाठी मिळालेल्या घरगुती वापराचे सिलेंडर्सपैकी ५ सिलेंडर्स बबलु नामे इसमास दिल्याची बाब पंचासमक्ष कबूल केली व सदरचे ५ रिकामे झालेले सिलेंडर्स परत मिळण्यासाठी तो बबलु यास भ्रमणध्वनीवर संपर्क साधित असल्याचे सांगितले. सदर अनधिकृत कामासाठी चंदू हा नियमितपणे बबलु यास काळाबाजारीने घरगुती वापराचे सिलेंडर मागणीनुसार रुपये १,०००/- प्रति सिलेंडरप्रमाणे विक्री करीत असल्याचे सांगितले. सदरचे ५ सिलेंडर्स कधी विक्री केले याबाबत चंदू याच्याकडे अधिकाऱ्यांनी अधिक विचारणा केली असता, आज दिनांक ३१/१२/२०१२ रोजी शकील अहमद खान उर्फ बबलु याने त्याच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधून बबलु याने सांगितल्यानुसार त्याच्या अधिपत्याखालील काम करणारे इम्रान फकीर मोहम्मद शेख व अब्दुल कलाम अयुब शेख यांच्या ताब्यात ५ सिलेंडर्स दिले व सदर दोन्ही इसमांनी ५ सिलेंडर्सचा साठा त्यांचेकडील थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-सीई-१३१८ मधून घेऊन गेले. तद्नंतर अधिकाऱ्यांनी पोलिस पथकासमवेत चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदु यास त्याचेकडील टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ हे त्यामधील सिलेंडर्सच्या साठ्यासह घटनास्थळी घेऊन आले. अधिकाऱ्यांनी सदर टेम्पोमधील सिलेंडर्सच्या साठ्याची पंचांसमक्ष मोजदाद केली असता, त्यामध्ये २४ रिकामे घरगुती वापराचे सिलेंडर्स आढळून आले. अधिकाऱ्यांनी चंदू या डिलेव्हरी बॉयची झाडझडती घेतली असता, १ भ्रमणध्वनी व एकूण

८२ ग्राहकांना देण्याचे कॅश मेमो त्याच्याकडे आढळून आले. वास्तविक पाहता चंदू या डिलेव्हरी बॉयकडे ग्राहकांना डिलेव्हरी पोच केल्याचे पोच पावती असणे आवश्यक असताना ग्राहकांच्या कॅश मेमो त्याच्याकडे सापडल्याने अधिकाऱ्यांना त्याबाबत साशंकता वाटली. सबब, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | दिनांक | गॅस ग्राहक क्रमांक | गॅस ग्राहकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | १७-१२-१२ | ५५५३४३१ | ज्युलिएट एस. डिमेलो |
| २ | १८-१२-१२ | ५५४०१५४ | जोसेफ स्कॅरीया ज्युनिअर |
| ३ | १९-१२-१२ | ६६१५९९३ | सुनिता साळगावकर |
| ४ | १९-१२-१२ | ५५३८२४० | दिपक मेनन |
| ५ | १९-१२-१२ | ५५३२४५० | एच. पी. आनंदपारा |
| ६ | १९-१२-१२ | ५५३४३७५ | बालबिर कौर |
| ७ | १९-१२-१२ | ५५३४३०७ | एन.एम. कोटीयन |
| ८ | १९-१२-१२ | ५५२५८४५ | संजयकुमार वर्मा |
| ९ | १९-१२-१२ | ५५४२५७५ | पास्कल रॉड्रीग्ज |
| १० | २०-१२-१२ | ५५५६०५२ | निधी दर्शन पारेख |
| ११ | २०-१२-१२ | ५५४४९०९ | इनिड एलव्हिन डी लिमा |
| १२ | २०-१२-१२ | ५५५२१९५ | रीतु महेश कॅन्सेर |
| १३ | २०-१२-१२ | ५५५३९६५ | विकास कमार एम श्रीवास्तव |
| १४ | २०-१२-१२ | ५५२९५०२ | अरुण विरामणी |
| १५ | २०-१२-१२ | ५५५३९२८ | पुनम मानसिंग ठाकुर |
| १६ | २०-१२-१२ | ५५५३२५० | कैष्णन आनंद |
| १७ | २०-१२-१२ | ५५५३९८० | मंदार केशव देशपांडे |
| १८ | २०-१२-१२ | ५५४०५८४ | शोभा राव |
| १९ | २२-१२-१२ | ६६१६९९३ | पिटर मेडोंसा |
| २० | २२-१२-१२ | ५५५१०१९ | निलम तुषार चालावलकर |
| २१ | २६-१२-१२ | ५५४६३२१ | रिटा जैस्वाल |
| २२ | २६-१२-१२ | ५५५४६९७ | सईद खान |
| २३ | २६-१२-१२ | ५५२८१७० | रमेश आर. ठाकुर |
| २४ | २६-१२-१२ | ५५२३१०९ | ललित मोहन जोशी |
| २५ | २६-१२-१२ | ५५२३३०९ | मार्टीन फर्नाडीस |
| २६ | २६-१२-१२ | ५५२८४५८ | नताशा डी.ए. |
| २७ | २६-१२-१२ | ५५२६९६३ | लाल टी. जगतियानी |
| २८ | २६-१२-१२ | ६६९५१८ | ए. जनेश्वरम |
| २९ | २६-१२-१२ | ६६११८९७ | सुनिता ए. डुग्गल |
| ३० | २८-१२-१२ | ५५३५७८७ | संगिता पारखिया |
| ३१ | २८-१२-१२ | ६६१६१९६ | एम.एम. फडनिस |
| ३२ | २८-१२-१२ | ५५३०९७९ | दास अशोककुमार डी. |



CONTROLLER OF RATIONING

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | २८-१२-१२ | ५६४८५९४९ | काश्मीरीलाल सिताराम गांधी |
| ३४ | २८-१२-१२ | ५५५४३३१ | जे.व्ही. मुंज |
| ३५ | २८-१२-१२ | ५५५४२१३ | रीतु सिंग |
| ३६ | २८-१२-१२ | ४९६७३४३६ | एसजीटी रॉय एस.के. |
| ३७ | निरंक | ५५४८२२५ | वर्मा |
| ३८ | निरंक | ५५४८२९१ | अरुण महेश राठोड |
| ३९ | निरंक | ५५२३९८१ | एम. झोराओ |
| ४० | निरंक | ५५५१७३५ | सलीम अब्दुल सत्तार |
| ४१ | निरंक | ५५५१७४६ | चंदन सुर्यवंशी |
| ४२ | निरंक | ५५३२४०० | मोहम्मद यासीर |
| ४३ | निरंक | ५५३५०५० | निलम विजेरा |
| ४४ | निरंक | ५५३८९२१ | किथ डिकॉस्टा |
| ४५ | निरंक | ५५६९७४५० | जी. सिंग नेगी |
| ४६ | निरंक | ५५२६३०७ | सनी चॅन्डी |
| ४७ | निरंक | ५५४२०२३ | ईकबाल झेड.एच. शेख |
| ४८ | निरंक | ५५३७३३० | परेश एल. भानुशाली |
| ४९ | निरंक | ५५२६८०४ | अकीम पटेल |
| ५० | निरंक | ६६९८३१ | बी. समशुद्दीन |
| ५१ | निरंक | ५५४२५६६ | एन.ए. शेख |
| ५२ | निरंक | ६६६२०४ | ॲनी जॉय |
| ५३ | निरंक | ५५४०९६९ | रॉबिन्सन फर्नांडीस |
| ५४ | निरंक | ५५२००१४ | के.एम. जॉन |
| ५५ | निरंक | ५५४१८९५ | मोहमद इस्माईल |

वर नमूद केलेल्या एकूण ५५ घरगुती गॅस ग्राहकांना सिलेंडर्सची डिलेव्हरी केल्याचे कॅश मेमो डिलेव्हरी बॉय चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदु याने ग्राहकांना न देता स्वंत:कडे बाळगले. तसेच संदरचे कॅश मेमोची स्थळप्रत संबंधीत मुक्ता गॅस सर्व्हीसेच मालक यांच्याकडे जमा केले किंवा कसे, याची खातरजमा करण्याकरिता पुढील तपासाकरीता अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष ताब्यात घेतले.

तसेच मुक्ता गॅस सर्व्हिसचे डिलेव्हरी बॉय चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदु यांच्याकडे डिलेव्हरी न झालेले कॅश मेमो खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | दिनांक | गॅस ग्राहक क्रमांक | गॅस ग्राहकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | २६-१२-१२ | ५५३१५८७ | गोरबक्ष सिंह |
| २ | २८-१२-१२ | ६६१०४६६ | सलमा के. कछला |
| ३ | २८-१२-१२ | ५५५५१७४ | सुप्रिया अनंत पडवळ |
| ४ | २८-१२-१२ | ५५६१७१४ | रमेश मजवानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | २८-१२-१२ | ५५३१३३४ | प्रदीप भाटीया |
| ६ | २८-१२-१२ | ५५२१७७९ | उर्मिला बल्लोनी |
| ७ | २६-१२-१२ | ५५५१०६१ | शेल्डन एल. पिंटो |
| ८ | २६-१२-१२ | ५५४३५९५ | मंगला सी. सोवाले |
| ९ | २६-१२-१२ | ५५३६५३८ | परविन बेगम |
| १० | २६-१२-१२ | ५५३७६७५ | समितभ सिन्हा रॉय |
| ११ | २९-१२-१२ | ५५३९९४५ | संजय बाजिराव गावडे |
| १२ | २९-१२-१२ | ५५३९४१८ | अन्नपुर्णा घंटे |
| १३ | २९-१२-१२ | ५५५३४४५ | अंबीदा रहिम शेख रेडकर |
| १४ | २९-१२-१२ | ५५२५६०१ | रजाकबी मुल्ला |
| १५ | २९-१२-१२ | ६६१२१३३ | बाजीराव व्ही. देसाई |
| १६ | २९-१२-१२ | ६६१५५८० | जयश्री बी. चौधरी |
| १७ | २९-१२-१२ | ५५३४८६० | लेस्टर फ्रॅन्क |
| १८ | २९-१२-१२ | ६६१८६०३ | जे. एम. अंताव |
| १९ | २९-१२-१२ | ६६१६०४० | हेतल डी. सा. |
| २० | २९-१२-१२ | ५५४१८८९ | एफ. एम. जैन |
| २१ | २९-१२-१२ | ५५२१२७४ | प्रविण व्ही. पाटील |
| २२ | २९-१२-१२ | ५६७१८३४८ | अहमद मोहिद्दीन असन |
| २३ | निरंक | ५५५४८६६ | ॲन्थोनी जोसेफ परेया |
| २४ | निरंक | ५५३७०५३ | शकीला बानो |
| २५ | निरंक | ५५३७९४७ | एम.के. देसाई |
| २६ | निरंक | ३३२९००७२ | मुजावर मेहबुब जी. |
| २७ | निरंक | ५५३१९७२ | अजय वेट्टोल |

सदर वितरणाबाबत खातरजमा करण्यासाठी अधिक विचारणा केली असता चंदु या डिलेव्हरी बॉयने उडवाउडवीचे उत्तरे दिली. घटनास्थळी दिलेल्या ५ सिलेंडर्स हे कोणत्या गॅस ग्राहकांचे आहेत याबाबत विचारणा केली असता, त्याने ग्राहक श्री. देवराम एस. जाधव क्रमांक ५५४०४५७, श्री. प्रभाकर शेट्टी ग्राहक क्र. ५५३५९८८ श्री. नारागुरु स्वामी ग्राहक क्र. ५५४१४७५, श्री. रामासिंग यादव ग्राहक क्र. ५५२५४६८ व श्री. मुनेंद्र सिंह ग्राहक क्र. ४३१३४६१४ या पाच ग्राहकांना त्यांचे घरगुती वापराचे सिलेंडर्स त्यांना न देता घटनास्थळी काळाबाजारीने अवैधरित्या विक्री केल्याचे कबूल केले. अधिकाऱ्यांना चंदू या डिलेव्हरी बॉयने केलेल्या वितरणाबाबत साशंकता वाटल्याने सदरचा टेम्पो हा त्यामधील २४ सिलेंडर्सच्या साठ्यासह जागीच जप्त केला व चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदु याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष नोंदवून घेतला आहे.

शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु यांनी दिलेल्या जबाबानुसार भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचे मालाड येथील अधिकृत वितरक मे. मुक्ता गॅस एजन्सी, मालाड या एजन्सीच्या डिलेव्हरी बॉय

चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदु, तसेच कृष्णा गॅस एजन्सी, मालाडच्या डिलेव्हरी बॉयकडून तसेच असु गॅस एजन्सी, कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय मनिराम, सुरेंद्र व बुध्दु त्यांच्या या अनधिकृत व्यवसायास घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा होत असल्याकारणाने त्याअनुषंगाने उपरोक्त तिन्ही गॅस एजन्सीचे प्रचलित पध्दतीनुसार संपूर्ण तपासणी घेण्यासाठी फिरत्या पथकामार्फत विशेष मोहिम घेण्यात आली. सदरच्या मोहिमेत तपासणी पथक सायंकाळी ०४:३० वाजता घटनास्थळावरुन रवाना झाले व सदरची तपासणी मोहिम पूर्ण करुन तपासणी पथक रात्री ११:५० वाजता घटनास्थळी उपस्थित राहून तपासणी अहवाल सादर केला. सदर अहवालाच्या अनुषंगाने मुक्ता गॅस एजन्सी, मालाडच्या तपासणीमध्ये घरगुती वापराचे भरलेले ८ सिलेंडर तसेच रिकामे ६३२ सिलेंडर कमी आढळून आले. तसेच औद्योगिक वापराचे ३५ सिलेंडर कमी आढळून आले व व्यवसायीक वापराचे ३४ सिलेंडर अतिरीक्त आढळून आले. सदर तपासणीमध्ये घरगुती वापराच्या एकूण ८०७ सिलेंडरची विक्री दर्शविण्यात आली. घटनास्थळी एजंन्सीचे भागीदार राजीव तुंगारे याचे प्रतिनिधी त्यांचे बंधु संजीव तुंगारे हे उपस्थित होत. तसेच सदर एजन्सीचे मॅनेजर किशोर सागवेकर यांच्याकडे पथकातील अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता, चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदु यास दिनांक ३१/१२/२०१२ रोजी डिलेव्हरी करण्याकरीता ३० सिलेंडर व त्यांचे कॅश मेमो देण्यात आले. तथापी, अधिकाऱ्यांनी चंदु याची घटनास्थळी झाडझडती घेतली. त्यावेळी दिनांक ३१/१२/२०१२ चे डिलेव्हरी कॅश मेमो अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष आढळून आले नाहीत. एकूण ८०७ दर्शविण्यात आलेल्या विक्रीपैकी प्रत्यक्षात ६५५ मुळ कॅश मेमोच्या स्थळप्रती तपासणीच्या वेळी सादर करण्यात आलेल्या आहेत. म्हणजेच दर्शविण्यात आलेल्या वितरणापैकी १५२ कॅश मेमो तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाहीत. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर तपासणी अहवालाचे अवलोकन केले असता, चंदु नामे डिलेव्हरी बॉय यास मुक्ता गॅस एजन्सीकडून दिनांक ३१/१२/२०१२ रोजी एकूण घरगुती वापराच्या ३० सिलेंडर्स देण्यात आले. तथापी, सदर ३० सिलेंडर्सपैकी ५ सिलेंडर्स घटनास्थळी धाडीच्यावेळी जप्त करण्यात आले आहेत. उर्वरीत २५ सिलेंडर्स चंदु या डिलेव्हिरी बॉयकडे असणे आवश्यक होते. तथापी, त्याचेकडील जप्त टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ मधून २४ सिलेंडर्स ताब्यात घेण्यात आले. म्हणजेच चंदु या डिलेव्हरी बॉयकडे ताब्यात देण्यात आलेल्या ३० सिलेंडर्सपैकी १ घरगुती वापराचा सिलेंडर कमी आढळून आला ही साशंकता निर्माण करणारी बाब असल्याचे अधिकाऱ्यांनी पंचांस सांगितले. तसेच चंदु याच्या ताब्यात असलेल्या ३० सिलेंडर्सचे कॅश मेमो अथवा त्यांची प्रत्यक्षात ग्राहकांना दिल्याची स्थळप्रत मिळून न आल्याने सदरचे ३० ही गॅस सिलेंडर्स अवैधमार्गाने काळ्याबाजारात विक्री केल्याचे प्रथमदर्शनी अधिकाऱ्यांना घडलेल्या घटनेवरुन आढळून आले.

0010 तसेच हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचे मालाड पश्चिम येथील अधिकृत गॅस वितरक मे. कृष्णा गॅस एजन्सी, मालाड(प) यांच्या तपासणीमध्ये घरगुती वापराचे भरलेले १०८९ सिलेंडर तसेच व्यवसायीक वापराचे रिकामे सिलेंडर ११२ कमी आढळून आले. यांबाबत मॅनेजर सुरेश श्यामनारायण मिश्रा याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदवून घेतला आहे.

तसेच हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड या कंपनीचे कांदिवली पश्चिम येथील अधिकृत गॅस वितरक मे. असु गॅस एजन्सी, कांदिवलीच्या तपासणीमध्ये घरगुती वापराचे भरलेले २९५८ सिलेंडर्स व व्यवसायीक वापराचे ४५८ सिलेंडर्स कमी आढळले. तसेच रिकामे घरगुती वापराचे १०२ सिलेंडर्स अतिरिक्त व व्यवसायीक वापराचे १७३३ सिलेंडर्स कमी आढळून आले. याबाबत मालक शांतुकुमार लक्ष्मीदास आशर याचा लेखी जबाब अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष नोंदवून घेतला आहे.

सदर धाडीत जप्त करण्यात आलेला मुद्देमाल खालीलप्रमाणे,

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग/ साठा | जप्त मुद्देमालाची अंदाजे किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | घटनास्थळी जप्त केलेल्या घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे पुर्ण भरलेले सिलेंडर्समधील गॅस | २ | १,८१२/- |
| २ | उक्त घरगुती वापराचे रिकामे सिलेंडर्स | २ | २,९००/- |
| ३ | घटनास्थळी जप्त केलेल्या घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे अर्धवट भरलेले सिलेंडर्समधील गॅस | १ | ४५०/- |
| ४ | उक्त घरगुती वापराचे रिकामे सिलेंडर्स | १ | १,४५०/- |
| ५ | घटनास्थळी जप्त केलेल्या घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे रिकामे सिलेंडर्स | २ | २,९००/- |
| ६ | घटनास्थळी जप्त केलेल्या व्यवसायीक वापराचे १९ किलो वजनाचे पुर्ण भरलेले सिलेंडर्समधील गॅस | २ | ३,१००/- |
| ७ | उक्त व्यवसायीक वापराचे रिकामे सिलेंडर्स | २ | ४,०००/- |
| ८ | घटनास्थळी जप्त केलेल्या व्यवसायीक वापराचे १९ किलो वजनाचे अर्धवट भरलेले सिलेंडर्समधील गॅस | ५ | ३,७५०/- |
| ९ | उक्त व्यवसायीक वापराचे रिकामे सिलेंडर्स | ५ | १०,०००/- |
| १० | घटनास्थळी जप्त केलेल्या व्यवसायीक वापराचे १९ किलो वजनाचे रिकामे सिलेंडर्स | १० | २०,०००/- |
| ११ | घटनास्थळी जप्त केलेले थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ | १ | २,५०,०००/- |
| १२ | घटनास्थळी जप्त केलेले थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ | १ | २,५०,०००/- |
| १३ | घटनास्थळी जप्त केलेले थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ मधील जप्त १४.२ किलो वजनाचे घरगुती वापराचे रिकामे सिलेंडर्स | २४ | ३४,८००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | घटनास्थळी जप्त केलेली बजाज अव्हेंजर मोटर सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० | १ | १,००,०००/- |
| १५ | घटनास्थळी जप्त केलेले नोकिया कंपनीचे एक्सप्रेस म्युझिक मॉडलचा भ्रमणध्वनी | १ | ६,०००/- |
| १६ | घटनास्थळी जप्त केलेले नोकिया कंपनीचे एक्स२-०२ मॉडलचा भ्रमणध्वनी | १ | ५,०००/- |
| १७ | घटनास्थळी जप्त केलेले सॅमसंग कंपनीचे ड्युओज मॉडलचा भ्रमणध्वनी | ३ | १५,०००/- |
| १८ | घटनास्थळी जप्त केलेले सॅमसंग कंपनीचे ड्युअल सिम मॉडलचा भ्रमणध्वनी | १ | ५,०००/- |
| १९ | घटनास्थळी जप्त केलेले घरगुती वापराच्या सिलेंडर्सचे सिलची संख्या | ८५ | - |
| २० | घटनास्थळी जप्त केलेले व्यवसायीक वापराच्या सिलेंडर्सचे सिलची संख्या | ६० | - |
| २१ | घटनास्थळी जप्त केलेले लोखंडी नळी (बासरी) ची संख्या | ३ | ६००/- |
| | एकूण | | ७,१६,७६२/- |

अशाप्रकारे घटनास्थळी उपस्थित शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु हा त्याच्या चार सहकारी/कर्मचारी नामे मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख, अब्दुल कलाम शेख व मोहम्मद अकिल यामिन कुरेशी यांचे मदतीने घरगुती वापराचे गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरुन तो काळ्या बाजाराने विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने संदर घरगुती वापराच्या गॅस सिलेंडर्सच्या साठ्याचा अनधिकृतरीत्या प्रति सिलेंडर रुपये १,०००/- प्रमाणे पुरवठा करणारे मुक्ता गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चंद्रकांत चव्हाण, अंसु गॅस एजन्सी, कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय मनीराम, सुरेंद्र व बुध्दु व कृष्णा गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चव्हाण तसेच मुक्ता गॅस एजन्सी व कृष्णा गॅस एजन्सीचे मालक/भागीदार यांनी संगनमत करुन त्यांच्या ताब्यातील घरगुती वापराचे अनुदानित दराचे सिलेंडर्स हे प्रत्यक्षात ग्राहकास वितरीत न करता ते काळाबाजारीने अवैधरित्या विक्री केल्याचे धाडीत सिध्द होत असल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे दिसून येत असल्याने संबंधितांविरुध्द, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० तसेच दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द मालवणी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२०१३ दिनांक ०१/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे



DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यांत आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २९/०१/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस मो.सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चे मालक म्हणून शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु व थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चे मालक म्हणून अब्दुल सलाम ए शेख यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. परंतू गाडीचे कागदपत्रे सादर करण्यासाठी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यास विनंती केली. सदर सुनावणीस मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख व अब्दुल कलाम शेख हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०६/०२/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०६/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस मो.सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चे मालक म्हणून शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु व थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चा मालक म्हणून अब्दुल सलाम ए शेख यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये सादर केलेल्या स्वतंत्र लेखी निवेदनांसोबत गाडींचे कागदपत्रे सादर केली. सदर सुनावणीसही मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख व अब्दुल कलाम शेख हे उपस्थित राहिले व त्यांना काहीही म्हणवायाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही. तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सदर सुनावणीसही उपस्थित राहिले नाहीत. सदर प्रकरणी जप्त मुद्देमाल हा ज्वलनशिल असून मुद्देमाल हा पोलिस ठाण्याच्या आवारात जप्त करुन ठेवला असल्याने सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

CONTROLLER OF RATIONING

**युक्तिवाद :-**

दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस मो.सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चे मालक म्हणून उपस्थित शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु यांनी युक्तीवाद केला की, ते शपथपूर्वक सांगू इच्छितात की, दिनांक ३१/१२/२०१२ रोजी आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईबाबत निवेदन सादर करीत आहे की, तो बेरोजगार असून छोटेमोठे काम करुन आपले घर चालवित आहे. गॅस सिलेंडरची कोणाला गरज

असल्यास त्यांच्याकडून ५० रुपये व कार्ड घेऊन कंपनीवाल्यांकडून सिलेंडर उचलून तो कार्डवाल्यांना देतो. याच पध्दतीने गेल्या महिन्याभरापासून हॉटेलवाल्यांना सिलेंडर पोच करण्याचे काम त्याला मिळाले. सदर कामात एक माणूस त्याला मदतीला आहे. अचानक एके दिवशी अधिकाऱ्यांनी धाड टाकून त्याने सिलेंडर ठेवले म्हणून केस बनवली आहे. तो ५०/- रुपये घेऊन गॅस डिलेव्हरीचे काम करीत असल्याने व त्याच्याकडे इतर कोणतेही दुसरे काम नसल्यामुळे त्याला न्याय देऊन जप्त केलेले सिलेंडर परत देण्याची कृपा करावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले. तसेच दिनांक ०६/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहून मो.सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० ची कागदपत्रे सादर केली.

दिनांक २९/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चा मालक म्हणून उपस्थित अब्दुल सलाम ए शेख यांनी युक्तीवाद केला की, टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ हे भाडोत्री वाहन असून दिनांक ३१/१२/२०१२ रोजी त्याला अंबोजवाडी, मालवणी, मालाड (पश्चिम) येथे भाडे घेऊन जाण्यासाठी बोलावण्यात आले. सदर ठिकाणी गाडी घेऊन गेल्यावर त्याच्या गाडीमध्ये गॅसचे सिलेंडर भरुन मालवणी पोलिस ठाणे येथे नेऊन जमा करण्यात आले. त्यांचा धंदा बंद झाला असल्याने त्याचा भाडोत्री टेम्पो सोडण्याची कृपा करावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०६/०२/२०१३ रोजीच्या सुनावणीस थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चा मालक म्हणून उपस्थित अब्दुल सलाम ए शेख यांनी युक्तीवाद केला की, शकील नामे इसमाने त्याला काही सिलेंडर मालवणी चौकी येथे घेऊन जायचे असल्याने टेम्पो घेऊन बोलाविले. त्यानंतर आपल्या अधिकाऱ्यांनी त्याच्यावर केस करून गाडी जप्त केली आहे. सदर गाडीवर त्याचा उदरनिर्वाह अवलंबून असून मागील सुनावणीस सांगितल्याप्रमाणे त्याने गाडीचे कागदपत्रे दिले असून त्याची गाडी सोडण्याची कृपा करावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE MUMBAI

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ३१/१२/२०१२ रोजी अंबोजवाडी येथील आझाद नगर, गणेश मिल्क सेंटर समोरील झोपडपट्टीच्या विभागात, मालवणी, मालाड (प), मुंबई ४०० ०९५ येथे गैरमार्गाने खरेदी केलेल्या घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरमधील गॅस व्यवसायीक वापराच्या सिलेंडरमध्ये अवैधरित्या रिफीलींग होत असल्याबाबतची या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी

पंचासह उक्त ठिकाणी धाड टाकून घटनास्थळी उपस्थित शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु हा त्याच्या चार सहकारी/कर्मचारी नामे मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख, अब्दुल कलाम शेख व मोहम्मद अकिल यामिन कुरेशी यांचे मदतीने घरगुती वापराचे गॅस सिलेंडरमधून व्यवसायीक गॅस सिलेंडरमध्ये गॅस भरुन तो काळ्या बाजाराने विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने सदर घरगुती वापराच्या गॅस सिलेंडर्सच्या साठ्याचा अनधिकृतरीत्या प्रति सिलेंडर रुपये १,०००/- प्रमाणे पुरवठा करणारे मुक्ता गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चंद्रकांत चव्हाण, आसु गॅस एजन्सी, कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय मनीराम, सुरेंद्र व बुध्दु व कृष्णा गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चव्हाण तसेच मुक्ता गॅस एजन्सी व कृष्णा गॅस एजन्सीचे मालक/भागीदार यांनी संगनमत करुन त्यांच्या ताब्यातील घरगुती वापराचे अनुदानित दराचे सिलेंडर्स हे प्रत्यक्षात ग्राहकास वितरीत न करता ते काळाबाजारीने अवैधरित्या विक्री केल्याचे धाडीत सिध्द होत असल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे दिसून येत असल्याने संबंधितांविरुध्द मालवणी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२०१३ दिनांक ०१/०१/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन रुपये ७,१६,७६२/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त गुन्हा नोंद प्रकरणी पथकाने घटनास्थळी धाड टाकली असता, शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु हा त्याच्या चार सहकारी/कर्मचारी नामे मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख, अब्दुल कलाम शेख व मोहम्मद अकिल यामिन कुरेशी यांच्या मदतीने अवैधरित्या खरेदी केलेल्या घरगुती वापराच्या सिलेंडरमधून व्यवसायीक वापराच्या सिलेंडरमध्ये भरलोकवस्तीत धोकादायकरित्या गॅस भरत असताना रंगेहात पकडले आहे. सदरचे व्यवसायीक वापराचे अनधिकृत सिलेंडरचा साठा विविध हॉटेलवाल्यांना काळ्याबाजारीने विक्री करीत असल्याचे आरोपीतांनी घटनास्थळी कबूल केले आहे. सदर घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरच्या साठ्याचा पुरवठा मे. मुक्ता गॅस एजन्सीचे डिलीव्हरी बॉय चंद्रकांत चव्हाण, मे. आसु गॅस एजन्सीचे डिलीव्हरी बॉय मनीराम, सुरेंद्र व बुध्दू तसेच मे. कृष्णा गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चव्हाण यांचेकडून प्रति सिलेंडर रुपये १,०००/- प्रमाणे खरेदी करीत असल्याचे आरोपीतांनी दिलेल्या जबाबात कबूल केले असून त्यापैकी मे. मुक्ता गॅस एजन्सीचा डिलीव्हरी बॉय चंद्रकांत बळवंत चव्हाण यांस पथकाने घटनास्थळी त्याच्या ताब्यात असलेले थ्री व्हीलर टेम्पो क्रमांक एमएच-०२-वायए-६७२ व त्यामधील सिलेंडर्सच्या साठयासह ताब्यात घेतले असता, त्याने पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात नमूद ठिकाणी गॅस सिलेंडर्सची अवैध विक्री केल्याचे कबूल केले आहे. वरील नमूद सर्व आरोपीतांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करण्यात आले. तथापी, नमूद गुन्ह्यातील मुख्य आरोपी शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु याने उपस्थित राहून केवळ त्याचे जप्त असलेले मोटर

CONTROLLER OF RATIONING ... HEAD O... MUMB...

सायकल हे वाहन परत मिळणेबाबत दावा केला. तसेच इतर आरोपी नामे मोहम्मद जावेद बहाउद्दीन खान, इमरान फकीर मोहम्मद शेख व अब्दुल कलाम शेख यांनी सुनावणीस उपस्थित राहून त्यांना काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर करण्यास नकार दिला व उर्वरीत आरोपीतांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी सुनावणीस उपस्थित राहून आवश्यक पुरावादर्शक दस्ताऐवज सादर केले नाही. यावरुन आरोपी/अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्यं नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, घटनास्थळी जप्त करण्यात आलेला संपूर्ण घरगुती व व्यवसायीक वापराच्या सिलेंडर्सचा अवैध साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

तथापी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक २३/०५/२०१२ रोजीच्या पत्रान्वये " The seized LPG cylinder is a property of the Oil companies and therefore the premise of depositing money against the seized cylinder is not possible " असे नमूद असल्याने विविध धाडींमध्ये जप्त करण्यात आलेल्या विविध तेल कंपन्यांचा गॅस सिलेंडरचा साठा हा संबंधित तेल कंपन्यांची मालमत्ता आहे. सबब, उपरोक्त शासनजमा केलेल्या गॅस सिलेंडरच्या साठ्याची आकारण्यात आलेली रक्कम वसूल करणे शक्य नसल्याने सदरचा जप्त गॅस सिलेंडरचा संपूर्ण साठा हा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य यांचे मदतीने संबंधित तेल कंपनी यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ चे मालक यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी सुनावणीस उपस्थित राहून आवश्यक पुरावादर्शक दस्ताऐवज सादर केले नाही अथवा त्यांचे जप्त वाहन परत मिळण्यासंदर्भात दावा केला नाही. यावरुन सदर टेम्पोचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त टेम्पो परत मिळण्यासंदर्भात कसलेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. तसेच सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चे मालक अब्दुल सलाम ए शेख तसेच मो. सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चे मालक तथा मुख्य आरोपी शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु यांनी त्यांची वाहने परत मिळण्याबाबत विनंती केली आहे. तथापी, सदरचे तिन्ही वाहने घटनास्थळी कार्यरत असलेल्या अनधिकृत व्यवसायात अवैध वाहतूकीसाठी वापर करीत असल्याचे सिध्द झाले आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदर थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ व मो. सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० यांची प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण

रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकांस परत करण्याचा अथवा वाहनांचे मालक तेवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास पोलिसांनी सदरची तिन्ही वाहने जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेले नोकिया कंपनीचे एक्सप्रेस म्युझिक मॉडलचा भ्रमणध्वनी, नोकिया कंपनीचे एक्स२-०२ मॉडलचा भ्रमणध्वनी, सॅमसंग कंपनीचे ड्युओज मॉडलचा भ्रमणध्वनी व सॅमसंग कंपनीचे ड्युअल सिम मॉडलचा भ्रमणध्वनी पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

तसेच नमुद गुन्हयातील जप्त करण्यात आलेल्या घरगुती वापराच्या सिलेंडर्सचे ८५ सिल, व्यवसायीक वापराच्या सिलेंडर्स ६० सिल व ३ लोखंडी नळी (बासरी) या वस्तु सिलेंडर्स सिल करण्यासाठी तसेच गॅस भरण्यासाठी लागणारे साहित्य म्हणुन सदरच्या अवैध व्यवसायासाठी वापरण्यात आलेल्या असल्याने सदर मुद्देमाल हा किरकोळीने विक्री केल्यास त्यांचा पुन्हा गैरवापर होण्याची साशंकता आहे. सबब, सदरचा मुद्देमाल हा कायमस्वरुपी जप्त करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६- अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मालवणी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.नों.क्र. ०१/२०१३ दिनांक ०१/०१/२०१३अन्वये गुन्हा नोंद मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) जप्त करण्यात आलेले घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे पुर्ण भरलेले २ सिलेंडर्स, घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचा अर्धवट भरलेला १ सिलेंडर्स, घरगुती वापराचे १४.२ किलो वजनाचे २६ रिकामे सिलेंडर्स तसेच व्यवसायीक वापराचे १९ किलो वजनाचे पुर्ण भरलेले २ सिलेंडर्स, व्यवसायीक वापराचे १९ किलो वजनाचे अर्धवट भरलेले ५ सिलेंडर्स, व्यवसायीक वापराचे १९ किलो वजनाचे १० रिकामे सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) उपरोक्त शासनजमा करण्यात आलेल्या संपुर्ण घरगुती व व्यावसायीक वापराच्या गॅस सिलेंडर्सचा साठा हा पोलिसांनी, राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डिमेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांचे मदतीने संबंधित तेल कंपनी यांना बंधपत्र घेऊन देण्यात यावा.

३) जप्त करण्यात आलेले थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२, थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ व मो. सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० ही तिन्ही वाहने शासनजमा करण्यात येत आहे. सदर वाहनांची बाजारमुल्या एवढी प्रत्येकी रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनांचे मालक सदरची प्रत्येकी रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेले नोकिया कंपनीचे एक्सप्रेस म्युझिक मॉडलचा भ्रमणध्वनी, नोकिया कंपनीचे एक्सर-०२ मॉडलचा भ्रमणध्वनी, सॅमसंग कंपनीचे ड्युओज मॉडलचा भ्रमणध्वनी व सॅमसंग कंपनीचे ड्युअल सिम मॉडलचा भ्रमणध्वनी याची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

६) उर्वरीत जप्त करण्यात आलेल्या घरगुती वापराच्या सिलेंडर्सचे ८५ सिल, व्यवसायीक वापराच्या सिलेंडर्सचे ६० सिल व ३ लोखंडी नळी (बासरी) या वस्तु कायमस्वरुपी जप्त करुन शासनजमा करण्यात यावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) शकील अहमद नबील अहमद शेख उर्फ बबलु
२) मोहम्मंद जावेद बहाउद्दीन खान

0018

३) इमरान फकीर मोहम्मद शेख
४) अब्दुल कलाम शेख
५) मोहम्मद अकिल यामिन कुरेशी
६) मे. मुक्ता गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चंद्रकांत बळवंत चव्हाण उर्फ चंदू
७) मे. मुक्ता गॅस एजन्सीचे मालक/भागीदार
८) मे. आसु गॅस एजन्सी कांदिवलीचे मालक/भागीदार
९) मे. आसु गॅस एजन्सी कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय मनीराम
१०) मे. आसु गॅस एजन्सी कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय सुरेंद्र
११) मे. आसु गॅस एजन्सी कांदिवलीचे डिलेव्हरी बॉय बुध्दु
१२) मे. कृष्णा गॅस एजन्सीचे मालक/भागीदार
१३) मे. कृष्णा गॅस एजन्सीचे डिलेव्हरी बॉय चव्हाण
१४) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएम-०२-सीई-१३१८ चा मालक अब्दुल सलाम ए शेख
१५) थ्री व्हिलर टेम्पो क्र. एमएच-०२-वायए-६७२ चा मालक
१६) मोटर सायकल क्र. एमएच-०४-सीएल-५७२० चा मालक

(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मालवणी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मालवणी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, संदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १० पी डिमेलो रोड, वाडी बंदर, मुंबई-४००,०१० (दुरध्वनी क्र. ०२२-३७५८१३०) यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
३) विभागीय व्यवस्थापक, मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
४) विभागीय व्यवस्थापक, मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.
५) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
६) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
७) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.